महाराष्ट्र शासन
पोलीस महासंचालक कार्यालय, महाराष्ट्र राज्य
महाराष्ट्र राज्य पोलीस मुख्यालय, शहीद भगतसिंग मार्ग, कुलाबा, मुंबई ४०० ००१

क्र. पोमसं /३६/ र. व का.(८३००) शा.नि.-अधिसूचना /०१/२०२३, मुंबई, दिनांक ११/०८/२०२३

**संदर्भ :-** महाराष्ट्र शासन, गृह विभाग, शासन निर्णय क्र.संकीर्ण-३६१६/ प्र.क्र.८१/भाग-३/पोल-३ दिनांक ०४ ऑगस्ट, २०२३.

**विषय :-** राज्यातील सीसीटीएनएस प्रकल्पाच्या देखभाल, दुरूस्ती व इतर आवश्यक बाबींकरिता निधी वितरित करण्याबाबत.

******

**परिपत्रक -**

महाराष्ट्र शासन, गृह विभाग, शासन निर्णय क्र. संकीर्ण-३६१६/ प्र.क्र.८१/भाग-३/पोल-३ दिनांक ०४ ऑगस्ट, २०२३. ची प्रत महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध असून त्याचा संगणक सांकेतांक २०२३०८०४१७१४२९४२२९ असा आहे.

२. तरी, सदर शासन निर्णयानुसार कृपया योग्य ती कार्यवाही करण्यात यावी.

( प्रविण शिखरे )
पोलीस महासंचालक यांचे उप सहायक(र.व.का.),
पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचेकरिता.

प्रति,

अपर पोलीस महासंचालक (नियोजन व समन्वय), महाराष्ट्र राज्य, मुंबई.
अपर पोलीस महासंचालक, राज्य गुन्हे अन्वेषण विभाग, महाराष्ट्र राज्य, मुंबई.

प्रत,

पोलीस उप अधिक्षक, संगणक कक्ष, पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई.



Scanned with CamScanner

राज्यातील सीसीटीएनएस प्रकल्पाच्या देखभाल, दुरुस्ती व इतर आवश्यक बाबींकरिता निधी वितरित करण्याबाबत.

महाराष्ट्र शासन

गृह विभाग

शासन निर्णय क्रमांक : संकीर्ण-३६१६/प्र.क्र.८१/भाग-३/पोल-३

मंत्रालय, २ रा मजला, मुख्य इमारत,

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक, मुंबई - ४०० ०३२.

दिनांक ४ ऑगस्ट, २०२३

वाचा :- १) शासन निर्णय गृह विभाग, क्रमांक एमआयएस ०५०८/७४८/प्र.क्र.३२९/पोल-४, दि.२२.०५.२००९.

२) पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे अध्यक्षतेखालील SEC (State Empowered Committee) समितीच्या दि.०४.०७.२०१६ रोजीच्या बैठकीचे कार्यवृत्त.

३) अपर मुख्य सचिव (गृह) यांच्या अध्यक्षतेखालील दि.१२.७.२०१६ व दि.२८.१२.२०१६ रोजीच्या बैठकीचे कार्यवृत्त.

४) मा. मुख्य सचिव यांच्या अध्यक्षतेखालील राज्य शिखर समितीच्या दि.१७.०१.२०१७, दि.०८.०२.२०१८, दि.०७.०९.२०१९, दि.२०.०७.२०२०, दि.१८.०५.२०२१, दि.१६.११.२०२१, दि.१०.०५.२०२२, दि.०४.११.२०२२ व दि. १२.७.२०२३ रोजीच्या बैठकीचे कार्यवृत्त.

५) शासन निर्णय, गृह विभाग क्र. सीसीटीएनएस-३६१५/प्र.क्र.२०२/भाग-५/पोल-३, दि.०९.०५.२०२२ व दि.१३.०१.२०२३.

६) शासन निर्णय, गृह विभाग क्र. सीसीटीएनएस-३६१५/प्र.क्र.२०२/भाग-३/पोल-३, दि.०१.०७.२०२२.

७) अपर पोलीस महासंचालक (नि. व स.), पोलीस महासंचालक कार्यालय, मुंबई यांचे पत्र क्र.पोमसं/१७/६१६२/सीसीटीएनएस प्रकल्प/१५/२०१०-२२, दि.२७.७.२०२३.

८) शासन निर्णय, वित्त विभाग क्र.अर्थसं-२०२३/प्र.क्र.४०/अर्थ-३, दि.१२.४.२०२३.

**प्रस्तावना :-**

केंद्र शासनाच्या ई-गव्हर्नन्स योजनेच्या अंतर्गत राज्यात सीसीटीएनएस प्रकल्प राबविण्यात येत आहे. सदर प्रकल्पांतर्गत राज्यातील ११२९ पोलीस ठाणी व ६६९ वरिष्ठ पोलीस कार्यालये CAS (Core Application Software) सॉफ्टवेअरव्दारे जोडण्यात आली आहेत. सदर प्रकल्पाचे दि.१५.०९.२०१५ रोजी मा. राज्यपाल महोदयांच्या हस्ते लोकार्पण पार पडले आहे. सीसीटीएनएस प्रकल्पांतर्गत जोडण्यात आलेल्या १०५४ पोलीस ठाणी व ६२९ वरिष्ठ कार्यालयामध्ये २ mbps नेटवर्क कनेक्टीव्हिटी उपलब्ध करुन देण्यात आली आहे. सदर प्रकल्पाच्या देखभाल व दुरुस्तीसाठी व इतर आवश्यक बाबींकरीता येणारा खर्च राज्य शासनामार्फत करणे आवश्यक आहे.

२. सीसीटीएनएस प्रकल्पाचे सिस्टम इंटीग्रेटर मे. विप्रो लि. या कंपनी बरोबर दि.२२.०३.२०१२ रोजी पाच वर्षांसाठी सेवा करार करण्यात आला. सदर कराराची मुदत दि.१४.०९.२०२० रोजी संपुष्टात आली होती.

Scanned with CamScanner

मा.मुख्य सचिव यांच्या अध्यक्षतेखालील राज्य शिखर समितीच्या दिनांक २०.०७.२०२० रोजीच्या बैठकीत मे.विप्रो लि. यांना दि.१५.०९.२०२० ते दि.१४.०९.२०२१ पर्यंत मुदतवाढ देण्यात आली होती. तद्नंतर शासन निर्णय, गृह विभाग दि.०९.०५.२०२२ अन्वये मे.विप्रो लि. यांना दि.१५.०९.२०२१ ते दि.१४.०९.२०२२ पर्यंत रु.९,५१,४३,८५०/- इतक्या रकमेच्या खर्चासह मुदतवाढीस प्रशासकीय मंजूरी देण्यात आली. तद्नंतर शासन निर्णय, गृह विभाग दि.१३.०१.२०२३ अन्वये मे. विप्रो लि. यांना दि.१५.०९.२०२२ ते दि.१४.०९.२०२३ पर्यंत किंवा नवीन पुरवठादारास प्रकल्पाचे काम हस्तांतरीत करेपर्यंत, जे अगोदर घडेल तोपर्यंत जीएसटी करासहीत रु.९,९५,९२,०००/- इतक्या रकमेच्या खर्चासह मुदतवाढीस दिनांक १३ जानेवारी, २०२३ च्या शासन निर्णयान्वये प्रशासकीय मंजूरी देण्यात आली आहे.

अपर पोलीस महासंचालक (नि. व स.), पोलीस महासंचालक कार्यालय, मुंबई यांनी संदर्भ क्रमांक. ७ दिनांक २७.७.२०२३ च्या पत्रान्वये केलेल्या विनंतीच्या अनुषंगाने सीसीटीएनएस प्रकल्पाचे पुरवठादार मे. विप्रो लि. यांनी O&M for CCTNS Application, Cloud Support Services and Helpdesk यासाठी दिनांक १५.३.२०२३ ते दिनांक १४.६.२०२३ या तीन महिन्याच्या कालावधीत केलेल्या कामासाठी रुपये २,४८,९८,०००/- (जीएसटीसह) इतकी रक्कम वितरीत करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. त्या अनुषंगाने शासनाने खालीलप्रमाणे निर्णय घेतला आहे.

**शासन निर्णय :**

सीसीटीएनएस प्रकल्पाच्या देखभाल, दुरुस्ती व इतर आवश्यक बाबींकरिता सीसीटीएनएस प्रकल्पाचे पुरवठादार मे. विप्रो लि. यांनी O&M for CCTNS Application, Cloud Support Services and Helpdesk यासाठी दिनांक १५.३.२०२३ ते दिनांक १४.६.२०२३ या तीन महिन्याच्या कालावधीत केलेल्या कामासाठी रुपये २,४८,९८,०००/- (जीएसटीसह) इतकी रक्कम (अक्षरी रुपये दोन कोटी अठ्ठेचाळीस लाख अठ्ठयाण्णव हजार फक्त) इतकी रक्कम वितरीत करण्यास मंजुरी देण्यात येत आहे.

२. सीसीटीएनएस प्रकल्पाच्या देखभाल, व दुरुस्तीसाठी व इतर आवश्यक बाबींसाठी येणारा खर्च "मागणी क्र.बी-१, २०५५-पोलीस, (००) १०९ जिल्हा पोलीस, (००) १४ गुन्हा व गुन्हेगारी माग काढण्यासाठी नेटवर्क यंत्रणा (राज्य योजना), दत्तमत, (२०५५ए०९७), ५०- इतर खर्च" या लेखाशीर्षाखाली खर्ची टाकण्यात यावा व तो सन २०२३-२०२४ या वित्तीय वर्षातील मंजूर अनुदानातून भागविण्यात यावा.

३. उक्त निधी कोषागारातून आहरण करण्यासाठी अपर पोलीस महासंचालक, गुन्हे अन्वेषण विभाग, महाराष्ट्र राज्य, पुणे यांना "नियंत्रण अधिकारी" व त्यांच्या अधिपत्याखालील आहरण व संवितरण अधिकाऱ्याला "आहरण व संवितरण अधिकारी" म्हणून घोषित करण्यात येत आहे. उपरोक्त निधी सीसीटीएनएस प्रकल्पांतर्गत करण्यात आलेल्या कामासाठी केंद्र शासनाच्या निदेशानुसार खर्च करण्यात यावा व खर्च करण्यात आलेल्या रकमेची उपयोगिता प्रमाणपत्रे वेळोवेळी शासनास सादर करावी.

४. सदर शासन निर्णय, वित्त विभाग शासन निर्णय क्र. विअप्र-२०१३/प्र.क्र.३०/२०१३/विनियम, भाग-२, दि.१७.०४.२०१५ मधील वित्तीय अधिकार नियम पुस्तिका-१९७८, भाग-पहिला, उपविभाग-दोन, महाराष्ट्र आकस्मिक खर्च नियम, १९६५ अन्वये प्रदान करण्यात आलेल्या वित्तीय अधिकारानुसार व अ.क्र.२७अ, नियम क्र.७६ अन्वये प्रशासकीय विभागाला असलेल्या अधिकारानुसार व मा. मुख्य सचिव यांच्या अध्यक्षतेखाली राज्य



Scanned with CamScanner

शिखर समितीच्या (SAC) दिनांक ०४.११.२०२२ व दिनांक १२.७.२०२३ रोजीच्या बैठकीतील निर्णयानुसार तसेच वित्त विभागाने निधी वितरणास दिलेल्या मान्यतेस अनुसरुन निर्गमित करण्यात येत आहे.

५. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या वेबसाईटवर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०२३०८०४१७१४२९४२२९ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकीत करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

RUPALI SANJOG KABARE

(रुपाली कबरे)
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. मा. राज्यपाल यांचे सचिव, राजभवन, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
२. मा. मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई.
३. मा. उप मुख्यमंत्री (गृह) यांचे सचिव, मंत्रालय, मुंबई.
४. मा. मुख्य सचिव, यांचे वरिष्ठ स्वीय सहायक. मंत्रालय, मुंबई.
५. अपर मुख्य सचिव (गृह) यांचे वरिष्ठ स्वीय सहायक
६. प्रधान सचिव (विशेष) यांचे स्वीय सहायक
७. पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
८. अपर पोलीस महासंचालक (नि. व स.), महाराष्ट्र राज्य, मुंबई.
९. अपर पोलीस महासंचालक, राज्य गुन्हे अभिलेख कक्ष, गुन्हे अन्वेषण विभाग, महाराष्ट्र राज्य, पुणे.
१०. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता/लेखापरीक्षा), महाराष्ट्र १/२, मुंबई/नागपूर.
११. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई.
१२. निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई.
१३. जिल्हा कोषागार अधिकारी, पुणे.
१४. प्रकल्प संचालक, मे. विप्रो प्रा. लि., मुंबई.
१५. वित्त विभाग, व्यय-७/ वित्तीय सुधारणा.
१६. कक्ष अधिकारी, अर्थ-१, गृह विभाग.
१७. निवडनस्ती, पोल-३.



Scanned with CamScanner